ऐक्य
९१ वर्षांची वाचनीय परंपरा
site : www.dainikaikya.com सातारा बुधवार दि. ३०/९/२०१५ email : news@dainikaikya.o

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगांव

## कोरेगावात कर्मवीर जयंती उत्साहात

**सातारा,** दि. २९ : डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त कोरेगाव शहरातून ढोल ताशाच्या गजरात त्यांच्या प्रतिमेची मिरवणूक काढण्यात आली. मिरवणूक भगवा चौक, सुभाषनगर चौक, शांतीनगर, जुना मोटार स्टँड, आझाद चौक, जळगाव रोड, बाजारपेठ, ग्रामपंचायत कार्यालय, भैरवनाथ मंदिर अशी काढण्यात आली. सरपंच सौ. विद्या येवले, उपसरपंच राहुल बर्गे, व्ही. एम. बर्गे, शहाजीराव बर्गे, अमर बर्गे, दिनेश बर्गे, शिवलिंग बर्गे, प्रकाश वीरकर, अशोक बनकर, गणेश उत्सव मंडळांनी कर्मवीर अण्णांच्या प्रतिमेचे पूजन केले. याप्रसंगी झांज पथकाची प्रात्यक्षिके करण्यात आली. यावेळी प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक, राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक, राष्ट्रीय छात्र सेनेचे विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.